# महाराष्ट्र शासन

क्रमांक :- एसएलएस २०२०/ प्र. क्र.१५१/२०(१)/ आ(वर्ग-२)

दुरध्वनी क्र. ०२२ २२७९४१४५
ई-मेल :-doesttclass२.wrd@maharashtra.gov.ir

जलसंपदा विभाग
३ रा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक :- ०६ जूलै, २०२१

प्रति,

मुख्य अभियंता (यांत्रिकी),
जलसंपदा विभाग,
नाशिक.

**विषय :-** उप अभियंता (यांत्रिकी) पदावर पदोन्नतीस पात्र अशा सहाय्यक अभियंता श्रेणी -२/ कनिष्ठ अभियंता/ शाखा अभियंता (यांत्रिकी) यांची सन २०२०-२०२१ ची निवडसूची बनविण्याबाबत.

**संदर्भ :-** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक-दिव्यांग २०१५/प्र.क्र.१७१/१६-अ, दिनांक ०५.०७.२००१

संदर्भाधिन शासन निर्णयान्वये राज्य शासनातील दिव्यांग अधिकारी/कर्मचाऱ्यांना गट अ व गट ब मधील पदांवर पदोन्नतीमध्ये ४% आरक्षण विहित करण्यात आले आहे. सदर ४% आरक्षण पुढील "अ", "ब" आणि "क" या दिव्यांग प्रकारांसाठी प्रत्येकी १% तसेच "ड" व "इ" या प्रकारांसाठी १% , या प्रमाणात देण्यात आले आहे.

अ) अंध/अल्पदृष्टी

ब)कर्णबधीरता अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता

क) अस्थीव्यंगता/मेंदूचा पक्षाघात (cerebral palsy)/कुष्ठरोग मुक्त(Leprosy cured)/ शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism)/ आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims)/स्नायु विकृती (Muscular dystrophy)

ड) स्वमग्नता (Autism)/मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability)/विशिष्ट शिक्षण अक्षमता (Specific learning disability)/मानसिक आजार (Mental Illness)

इ) वरील अ ते ड मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणाऱ्यांसाठी त्यांचेसाठी सुनिश्चित करण्यात आलेल्या पदांवर

२. उप अभियंता (यांत्रिकी) पदावर पदोन्नतीस पात्र अशा सहाय्यक अभियंता श्रेणी २/ कनिष्ठ अभियंता/ शाखा अभियंता ( विद्युत व यांत्रिकी) यांची २०२०- २०२१ ची निवडसूची तयार

करावयाची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. या पार्श्वभूमीवर सहायक अभियंता श्रेणी-२ (यांत्रिकी) व कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) संवर्गाच्या ज्येष्ठता याद्या अनुक्रमे शासन परिपत्रक, कमांक-ज्येष्ठता २०१६/(७४/२०१६)/आ(सअश्रे-२), दिनांक ०१.१२.२०१८ व शासन परिपत्रक, क्रमांक- ज्येष्ठता १११८/(प्र.क्र.१२१/२०१८)/आ(तांत्रिक), दिनांक ३०.०६.२०१८, या ज्येष्ठता याद्यांमधील, **उप अभियंता (यांत्रिकी) संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमानुसार पदोन्नतीसाठीची अर्हताकारी सेवा पूर्ण करणाऱ्या दिव्यांग अभियंत्यांची पदोन्नतीच्या अनुषंगाने माहिती** सोबतच्या विवरणपत्रामध्ये नमूद रकान्याप्रमाणे MS-Excel या फॉटमध्ये माहिती टंकलिखित करून Soft Copy व Hard Copy सह दिनांक १४.०७.२०२१ पर्यंत शासनास उपलब्ध करून देण्यात यावी. उप अभियंता (यांत्रिकी) पदासाठी मागविण्यात आलेल्या अभियंत्यांची माहिती ही पदोन्नतीची पूर्वतयारी म्हणून मागविण्यात येत आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

(रणजीत शि. अहिरे)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**सोबत-विवरणपत्र-अ**

प्रत :- आस्था (वर्ग-२) कार्यासन संग्रहार्थ.

## विवरणपत्र अ

उप अभियंता (यांत्रिकी) पदावर दिव्यांग प्रवर्गातून पदोन्नती विचारक्षेत्रात असलेल्या सहायक अभियंता श्रेणी २/कनिष्ठ अभियंता (शाखा अभियंता) (यांत्रिकी) यांचा सेवातपशील

| अ. क्र | जेष्ठता क्र | अधिकारी यांचे नाव (मराठीत संपूर्ण नाव द्यावे आद्याक्षरे देऊ नयेत.) | जन्मदिनांक (दिनांक DD MM-YY या नमुन्यात द्यावा.) | सेवानिवृत्तीचा दिनांक | शैक्षणिक पात्रता | कनिष्ठ पदावरील नियुक्तीचा दिनांक | मूळ जात प्रवर्ग (जात/पोटजात नमूद करावी)/ | नियुक्तीचा जात प्रवर्ग | जात प्रमाणपत्राची वैधता झाली आहे किंवा कसे | महाराष्ट्राचे मूळ निवासी आहेत किंवा कसे? | व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण आहेत काय, असल्यास दिनांक | मराठी/हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण आहेत काय असल्यास दिनांक | संगणक परीक्षा उत्तीर्ण आहेत काय, असल्यास दिनांक | विभागीय चौकशी चालू/प्रस्तावित आहे किंवा कसे? असल्यास दोषारोप पत्राची प्रत उपलब्ध करून द्यावी. | स्थायित्व प्रमाणपत्र | सदर अधिकारी यांचे ५०/५५ वर्षाचे पुर्नविलोकन झाले आहे काय? | सन २०१५-१६ ते २०१९-२० या कालावधीच्या गोपनीय अहवालातील प्रतिकूल शेरे कळविण्यात आलेले आहेत काय, असल्यास त्याची प्रत द्यावी | दिव्यांगत्वाचा प्रकार (अ/ब/क/ड/इ) ** | दिव्यांग प्रमाणपत्र देणारे प्राधिकारी, व प्रमाणपत्राचा दिनांक, सोबत साक्षांकित प्रमाणपत्र सादर करण्यात यावे | अधिकारी स्वत: विधवा/परित्यक्ता असल्यास त्याबाबतचा पुरावा/अधिकारी किंवा त्याचे मूल मतिमंद असल्यास त्याबाबतचा पुरावा सादर करावा | सदर अभियंत्याने दिनांक ३१ मार्च २०२० अखेरचे मत्ता व दायित्व प्रमाणपत्र सादर केले आहे किंवा कसे ? | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

**दिव्यांगत्वाचा प्रकार निश्चित करतेवेळी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक-दिव्यांग २०१५/प्र.क्र.१७१/१६-अ, दिनांक ०५.०७.२००१ मधील तरतुदी गृहित धरण्यात याव्यात.